# प्रेसनोट दि.१२/०१/२०१८

## ओएलएक्स वेबसाईटवर ऑनलाईन स्कुटी विकण्याच्या बहान्याने आर्थिक फसवणूक करणारा .... सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.

ऑनलाईन खरेदी-विक्री करण्याऱ्या वेबसाईटवर विवीध टु व्हिलर विक्री संदर्भातील अनेक जाहीराती अपलोड करून नागरिकांकडून पैसे उकडण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांनी स्कुटी ही गाडी घेण्यासाठी इंटरनेटवर सर्फींग करीत असताना ओएलएक्स या खरेदी-विक्री या वेबसाईटवर स्कुटी ही गाडीची जहिरात दिसून आली. फिर्यादी यांनी सदर जहिरातीमध्ये संपर्कासाठी नमुद करण्यात आलेल्या मोबाईल नंबरवर कॉलींगव्दारे संपर्क केल्यानंतर अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांना पैसे जमा केल्यानंतर स्कुटी या गाडीची डिलीव्हरी करण्यात येईल असे सांगितले. फिर्यादी यांना स्कुटी ही गाडी विकत घेण्यासाठी अज्ञात व्यक्तीने रक्कम रु. १८,०००/- हे जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली असल्याने खडक पोलीस ठाणे गु.रं.नं. ०९/२०१८, भा.द.वि. कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६सी, ६६ डी, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल येथे झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार केली होती. मा. पोलीस उप आयुक्त, आ.व.सा., गुन्हे यांच्या मागदर्शनाखाली दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सौ. मनिषा झेंडे, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत आहेत. सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित मोबाईल कंपनी व बँक यांना पत्रव्यवहार करून त्यांचेकडून माहिती प्राप्त केली. मोबाईल कंपनी व बँकेकडून प्राप्त माहितीचा तांत्रिक अभ्यास करून आरोपी हे मुंबई व ठाणे येथे असल्याचे निष्पन्न केले. त्या अनुशंगाने मा. पोलीस आयुक्त, आ.व.सा., यांच्या परवानगीने मुंबई येथे पथक रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी जावून आरोपी नामे १) **साजीद मोहम्मद शेख, वय- ३७ रा-फ्लॅट नं ८ ए/४०५, पाटलीपुत्र कॉलनी, जोगेश्वरी वेस्ट, मुंबई, २) नासीर अब्बास शेख, वय- ४० रा- रुम नं ३०२, तीसरा मजला, मदीना मंजील, मुब्रा ठाणे** यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडुन ०४ मोबाईल हॅन्डसेट, ०१ डोंगल, विवीध बँकेची १३ डेबीट कार्ड हे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपींना ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी खडक पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडे करण्यात तपासामध्ये पुणे शहरामध्ये ०५ नागरिकांची या व्यक्तीरिक्त महाराष्ट्रातील ३० लोकांना अशा प्रकारे फसवणूक करून आर्थिक फसवणूक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर अशा प्रकारे फसवणूकीबाबत निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेले आहेत.

सदरची कारवाई ही श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, मा. निलेश मोरे, सहा पोलीस आयुक्त, सायबर सेल, मार्गदर्शन खाली पो.नि. सौ. मनिषा झेंडे, पोलीस कर्मचारी- किरण अब्दागिरे, नवनाथ जाधव, अमीत औचरे, शितल वानखडे यांच्या पंथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा ऑनलाईन खरेदी – विक्री करणाऱ्या वेबसाईटवरील जहिराती यांची पडताळणी करूनच पैसे जमा करावेत तसेच खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये त्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.